# समुदाय आरोग्य अधिकारी समुपदेशन ३ री फेरी

## <u>उमेदवारांना सुचना</u>

दिनांक ०६ मार्च २०२०

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत समुदाय आरोग्य अधिकारी पदांची समुपदेशनाची १ ली फेरी सोलापूर येथे दिनांक १६/०२/२०२० रोजी पार पडलेली आहे. त्याचसोबत समुपदेशाची २ री फेरी दिनांक २९/०२/२०२० रोजी राज्य कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, पुणे येथे पार पडलेली आहे.

**तथापि, सोलापूर येथे दिनांक १५/०२/२०२० रोजीच्या मुळ कागदपत्रे तपासणीस उपस्थित होते.** परंतू दिनांक १६/०२/२०२० रोजीच्या समुपदेशनास गैरहजर असलेले त्याचप्रमाणे, समुपदेशनास हजर होते परंतू, पसंतीचे प्रशिक्षण केंद्र उपलब्ध नसल्याने नकार कळविलेले अथवा, बिंदू नामावलीनुसार जागा शिल्लक नसल्याने प्रशिक्षण केंद्र निवडीची संधी प्राप्त न झालेले अशा पात्र **(किमान २२ व २२ पेक्षा जास्त गुण असलेले)** उमेदवारांकरिता **समुपदेशनाची ३ री फेरी राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई यांच्याकडून दिनांक ११/०३/२०२० रोजी सकाळी ०९.०० वाजता, मा. प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, जिल्हा सामान्य रुग्णालय आवार, औंध छावणी, पुणे-४११०२७** या ठिकाणी आयोजित करण्यात आलेली आहे.

तरी उमेदवारांनी शैक्षणिक अर्हतेच्या मुळ प्रमाणपत्र व ओळखपत्रासह वरील ठिकाणी वेळेत उपस्थित रहावे.

जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक<br>
तथा सदस्य सचिव<br>
समुपदेशन समिती, आरोग्य विभाग,<br>
जि.प.सोलापूर.